Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(A)| April-2026

Original Article

# भारतीय अर्थव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये आणि आव्हानांचा आढावा

**Pathan Ashapak Jafarkhan**
(संशोधक विद्यार्थी), कोहिनूर कॉलेज खुलताबाद, छत्रपती संभाजी नगर
Email- pathanashfaquekhan8888@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180413
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(A)
Pp 58-60
April- 2026
**Submitted:** 23 Mar. 2026
**Revised:** 30 Mar. 2026
**Accepted:** 14 Apr. 2026
**Published:** 30 April. 2026

**सारांश**

भारतची अर्थव्यवस्था ही जगातील वेगाने विकसित होणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने अग्रस्थानी असलेल्या भारताची अर्थव्यवस्था कृषी, उद्योग आणि सेवा या तीन प्रमुख क्षेत्रांवर आधारित असून सेवा क्षेत्राचा वाटा सर्वाधिक आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा अवलंब केला आणि *1991* नंतरच्या आर्थिक सुधारणांमुळे उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाला चालना मिळाली. मोठी युवा लोकसंख्या, वाढता मध्यमवर्ग आणि तंत्रज्ञानातील प्रगती ही भारतीय अर्थव्यवस्थेची महत्त्वाची वैशिष्ट्ये मानली जातात. भारतची अर्थव्यवस्था ही जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या आणि प्रभावी अर्थव्यवस्थांपैकी एक मानली जाते. प्राचीन काळापासून व्यापार, कृषी आणि हस्तकला यांमध्ये समृद्ध असलेल्या भारताने आधुनिक काळात औद्योगिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आर्थिक प्रगती साधली आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने जगात अग्रस्थानी असलेल्या भारताची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर मानवसंसाधनांवर आधारित आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही मिश्र स्वरूपाची असून येथे सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्र दोन्हींचा सहभाग आहे. स्वातंत्र्यानंतर नियोजनबद्ध विकासावर भर देण्यात आला आणि पंचवार्षिक योजनांद्वारे औद्योगिक व कृषी विकासाला चालना मिळाली. *1991* साली राबविण्यात आलेल्या आर्थिक सुधारणांमुळे उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला, ज्यामुळे परकीय गुंतवणूक वाढली आणि भारतीय उद्योगांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाली.

## प्रस्तावना

भारतीय अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषी, उद्योग आणि सेवा या तीन क्षेत्रांवर आधारित आहे. ग्रामीण भागातील मोठा वर्ग अजूनही शेतीवर अवलंबून आहे, तर औद्योगिक क्षेत्र देशाच्या उत्पादनक्षमतेत महत्त्वाची भूमिका बजावते. सध्या सेवा क्षेत्र, विशेषतः माहिती तंत्रज्ञान, बँकिंग, दूरसंचार आणि पर्यटन, देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात मोठा वाटा उचलत आहे. वाढती शहरीकरणाची प्रक्रिया, डिजिटल व्यवहारांची वाढ आणि पायाभूत सुविधांमध्ये होणारी गुंतवणूक यांमुळे अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळत आहे.

तथापि, बेरोजगारी, गरिबी, उत्पन्नातील असमानता आणि ग्रामीण-शहरी दरी यांसारखी आव्हाने अजूनही अस्तित्वात आहेत. तरीसुद्धा युवा लोकसंख्या, कौशल्यविकास, स्टार्टअप संस्कृती आणि तांत्रिक प्रगती यांच्या बळावर भारतीय अर्थव्यवस्था भविष्यात अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक होण्याची क्षमता बाळगून आहे. त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था ही गतिशील, परिवर्तनशील आणि विकासाभिमुख अशी मानली जाते. भारतीय अर्थव्यवस्था ही 'संधी' आणि 'आव्हाने' यांचा मेळ आहे. नीती आयोगाच्या मार्गदर्शनाखाली भारत **'आत्मनिर्भरते'** कडे वाटचाल करत आहे. जर आपण उत्पादन क्षेत्र (Manufacturing) मजबूत केले आणि कृषी क्षेत्राला तंत्रज्ञानाची जोड दिली, तर ही आव्हाने पेलणे सुलभ होईल.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*Pathan Ashapak Jafarkhan, Research Student*

**How to cite this article:**
*Jafarkhan, P. A. (2026). भारतीय अर्थव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये आणि आव्हानांचा आढावा. Journal of research & development, 18(4(A)), 58–60. https://doi.org/10.5281/zenodo.20377570*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.20377570

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(A)| April-2026

**गृहितक**

1) भारता जवळ असलेली मोठी युवा लोकसंख्या आणि मानवी संसाधने व नैसर्गिक संसाधने ही आर्थिक विकासासाठी महत्त्वाची आहेत.

2) भारताने आपल्या तंत्रज्ञानातील प्रगती, डिजिटल व्यवहार आणि पायाभूत सुविधा वरील गुंतवणूक यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळाली आहे.

3) भारतात आर्थिक विकास होत असून बेरोजगारी, गरिबी आणि उत्पन्नातील असमानता ही अजून एक गंभीर समस्या आहे.

4) भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी क्षेत्रावर पूर्णपणे निर्भर न राहता सेवा क्षेत्राकडे त्याचे कल दिसत आहे.

**उद्दिष्टे**

1) भारतीय अर्थव्यवस्थेची मूलभूत संरचना आणि प्रमुख वैशिष्ट्ये यांचे अभ्यास करणे.

2) नवीन आर्थिक सुधारणांचा (1991) भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम अभ्यासणे.

3) भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रमुख तीन क्षेत्रे कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्राची भूमिका विश्लेषित करणे.

4) भारतीय अर्थव्यवस्थे समोरील प्रमुख आव्हानांचे शोध घेणे.

**विषय विवेचन**

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रदान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. मात्र कृषीक्षेत्राचे GDP मधील वाटा केवळ 18.85% इतका कमी असणे हे विकसनशील अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे लक्षण असते. सद्यस्थितीत एकूण लोकसंख्येच्या जवळपास 52% लोकसंख्या शेती व शेतीसंबधीत क्षेत्रावर कार्यरत आहे. भारतीय कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा अभाव असल्यामुळे उत्पादकता कमी आहे जलसिंचनाच्या अपुऱ्या सोई अशा अनेक कारणांमुळे भारतातील शेतकरी कर्जबाजारीत अडकलेला आहे त्यामुळे शेतीचे प्राबल्य कमी करण्याचे आव्हाण भारतीय अर्थव्यवस्थेसमोर आहे. दरडोई उत्पन्न म्हणजे देशातील प्रत्येक व्यक्तीच्या वाट्याला सरासरी किती उत्पन्न येते, याचे मोजमाप होय. हे काढण्याचे सूत्र खालीलप्रमाणे आहे:

दरडोई उत्पन्न = देशाची एकूण लोकसंख्या (Total Population)

देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न (National Income)

देशाचे दरडोई उत्पन्न हे देशाच्या आर्थिक स्थितीचे महत्वाचे निर्देशक असते दरडोई उत्पन्नात वेगाने वाढ घळवून आणणे हे भारतीय नियोजनाचे महत्वाचे उदिदष्ट असते मात्र भारतात त्याचा स्तर कायमच कमी राहिलेला आहे. 2018-19 च्या तात्पुरत्या अंदाजानुसार चालु किमतीला मोजलेले दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न प्रतिवर्ष मोज 1,26,406 इतके होते अर्थात हा दर साधा सरासरी असल्याने त्याचे लोकसंख्येतील वितरण अपर्याप्त आहे.

म्हणजे देशातील संपत्ती आणि उत्पन्नाचे लोकांमध्ये होणारे असमान वाटप. जेव्हा देशाच्या एकूण उत्पन्नाचा मोठा हिस्सा केवळ मोजक्या श्रीमंत लोकांच्या हातात असतो आणि बहुसंख्य जनता कमी उत्पन्नावर जगते, तेव्हा त्याला 'आर्थिक विषमता' म्हणतात. भारतातील **वरच्या १% श्रीमंत लोकांकडे** देशातील एकूण संपत्तीच्या सुमारे **४०% पेक्षा जास्त हिस्सा** आहे.याउलट, खालच्या ५०% लोकसंख्येकडे देशाच्या एकूण संपत्तीचा केवळ ३% ते ६% हिस्सा आहे. **लोकसंख्या विस्फोट** म्हणजे जेव्हा एखाद्या देशाची लोकसंख्या अत्यंत वेगाने वाढते आणि देशातील उपलब्ध नैसर्गिक संसाधने (अन्न, पाणी, जमीन) ती वाढ पेलण्यास असमर्थ ठरतात. जेव्हा **जन्मदर (Birth Rate)** उच्च राहतो आणि प्रगत वैद्यकीय सुविधांमुळे **मृत्यूदर (Death Rate)** वेगाने खाली येतो, तेव्हा लोकसंख्येमध्ये जी प्रचंड वाढ होते, त्याला 'लोकसंख्या विस्फोट' म्हणतात. भारताने १९५१ ते १९८१ या काळात या स्थितीचा मोठा अनुभव घेतला आहे.भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात **'बेरोजगारी' (Unemployment)** ही एक गंभीर सामाजिक आणि आर्थिक समस्या आहे. जेव्हा एखादी व्यक्ती काम करण्यास इच्छुक असते आणि तिच्याकडे कामासाठी आवश्यक कौशल्य असते, तरीही तिला रोजगाराची संधी मिळत नाही, तेव्हा त्या स्थितीला बेरोजगारी म्हणतात. भारतीय अर्थव्यस्थेत ज्या काही प्रमुख समस्था आहेत त्या सर्व समस्या अतिशय उग्ररूप धारण करणारी समस्या म्हणजे बेकारीची समस्या होय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 75 वर्षे होऊनही भारतातील बेरोजगारीचे प्रमाण कमी झाले नाही याचे कारण भारतात वाढती लोकसंख्या, शेतीवरील अवलंबीत्व, तंत्रज्ञानाचा अभाव आणि उठ्योगाचा मंद विकास इत्यादीमुळे कारणा मुळे बेकारी वाढत आहे सद्यस्थितीत भारतातील बेरोजगारीचा दर 5% आहे. कोणत्याही देशाचा विकास हा प्रामुख्याने त्याच्या उत्पादन (Manufacturing) क्षेत्रावर अवलंबून असतो. भारताने शेतीकडून थेट सेवा क्षेत्राकडे (Services) झेप घेतली, ज्यामुळे औद्योगिक क्षेत्र (Secondary Sector) मध्यंतरीच्या काळात मागे राहिले.**कमी वृद्धीदर (Low Growth Rate)** औद्योगिक वृद्धीदर हा अनेकदा ४% च्या आसपास रेंगाळतो. शाश्वत विकासासाठी हा दर किमान १०% ते १२% असणे आवश्यक आहे. जेव्हा उद्योगांची वाढ मंद असते, तेव्हा देशाचा एकूण **जीडीपी (GDP)** देखील संथ गतीने वाढतो. दारिद्र्य म्हणजे अशी स्थिती जिथे व्यक्तीला आपल्या मूलभूत गरजा (अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण) पूर्ण करणे अशक्य होते.

**सुरेश तेंडुलकर समितीच्या (२०११-१२)** आकडेवारीनुसार:

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(A)| April-2026

- **एकूण दारिद्र्य:** २१.९%
- **ग्रामीण दारिद्र्य:** २५.७%
- **शहरी दारिद्र्य:** १३.३%

यावरून असे स्पष्ट होते की, भारताच्या ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण शहरी भागापेक्षा दुप्पट आहे. याचे मुख्य कारण म्हणजे ग्रामीण भागातील लोकांचे शेतीवर असलेले अतिअवलंबित्व आणि तिथे रोजगाराच्या इतर संधींचा अभाव.आजकल दारिद्र्य केवळ 'उत्पन्नावरून' मोजले जात नाही, तर ते **'बहुआयामी'** पद्धतीने मोजले जाते. यामध्ये तीन महत्त्वाचे निकष लावले जातात: १. **आरोग्य** (पोषण, बालमृत्यू) २. **शिक्षण** (शालेय वर्षे, उपस्थिती) ३. **राहणीमान** (पिण्याचे पाणी, वीज, घर, इंधन)**ग्रामीण भाग:** येथील दारिद्र्य हे मुख्यत्वे **'हंगामी'** असते. पावसावर अवलंबून असलेली शेती आणि शेतमजुरांची कमी मजुरी यामुळे हे लोक वर्षभर गरिबीत राहतात.**शहरी भाग:** शहरात स्थलांतरित झालेले लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहतात. त्यांना काम मिळते पण राहणीमानाचा खर्च जास्त असल्याने ते 'शहरी गरीब' म्हणून ओळखले जातात.

जरी २०-२५% लोक आजही दारिद्र्य रेषेखाली असले, तरी गेल्या दशकात कोट्यवधी लोक गरिबीतून बाहेर आले आहेत. मात्र, **'उत्पन्नाची विषमता'** आणि **'महागाई'** यामुळे पुन्हा लोक गरिबीत जाण्याची भीती असते. **भांडवल निर्मिती म्हणजे काय?** सोप्या भाषेत सांगायचे तर, देशातील उत्पन्नाचा जो भाग उपभोगावर (खाण्यापिण्यावर किंवा खर्चावर) खर्च न करता, भविष्यात अधिक उत्पादन घेण्यासाठी गुंतवला जातो (उदा. यंत्रसामग्री, कारखाने, रस्ते, तंत्रज्ञान), त्याला **'भांडवल निर्मिती'** म्हणतात. भांडवल निर्मितीचा दर अल्प राहिला तर आर्थिक वृद्धी दर ही कमी राहतो. भारतात राष्ट्रीय उत्पन्न कमी असल्याने त्यातील जास्तीत जास्त भाग उपभोगावर खर्च होत असल्याकारणाने बचतीचे प्रमाण कमी आहे . जोपर्यंत भारताचा भांडवल निर्मितीचा दर (Capital Formation Rate) वाढून तो ३०-३५% च्या पुढे जात नाही, तोपर्यंत शाश्वत १०% आर्थिक वृद्धीदर गाठणे कठीण आहे. विषय विवेचनावरून असे स्पष्ट होते की, भारत आता केवळ 'कृषिप्रधान' देश न राहता एक **'तांत्रिक आणि सेवा प्रधान'** देश म्हणून उदयास येत आहे. नीती आयोगाच्या मार्गदर्शनाखाली 'आत्मनिर्भर भारत' घडवण्यासाठी उत्पादन क्षेत्रात स्वावलंबी होणे आणि सामाजिक सुरक्षा योजनांच्या माध्यमातून विषमता दूर करणे ही काळाची गरज आहे.

**निष्कर्ष**

वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की भारतीय अर्थव्यवस्था ही जलद गतीने विकसित होणारी आणि तसेच परिवर्तनशील स्वरूपाची अर्थव्यवस्था आहे प्रामुख्याने भारतीय अर्थव्यवस्था ही तीन क्षेत्रांवर आधारित आहे कृषी क्षेत्र उद्योग क्षेत्र आणि सेवा क्षेत्र अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचा वाटा सातत्याने वाढत आहे 1991 च्या नवीन आर्थिक सुधारणांमुळे उदारीकरण खाजगीकरण जागतिकीकरण या प्रक्रियांची गती वाढलेली आहे व तसेच त्याचा सकारात्मक परिणाम ही दिसून येत आहे.

भारता जवळ असलेली युवा लोकसंख्या तसेच वाढते शहरीकरणाची प्रक्रिया आणि डिजिटल व्यवहार यांचे झालेले विस्तार व तंत्रज्ञानातील प्रगती ह्या सर्व भारतीय अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाच्या ठरत आहे या सर्व घटकांमुळेच उद्योगांचा सेवा क्षेत्रांचा व तसेच स्टार्टअप संस्कृतीचा जागतिक अर्थव्यवस्थेत सहभाग वाढत आहे. याचबरोबर भारतीय अर्थव्यवस्थेसमोर अनेक अडचणी आहेत जसे की बेरोजगारी गरिबी उत्पन्नातील असमानता ग्रामीण शहरी दरी लोकसंख्या दबाव आणि कृषी क्षेत्रातील कमी उत्पादकता इत्यादी ही आव्हाने अजूनही कायम आहेत याचबरोबर औद्योगिक क्षेत्राचा भांडवल निर्मितीचा कमी दर ही देखील एक महत्त्वाची अडचण आहे.

**संदर्भ**

1. दत्त आणि सुंदरम – भारतीय अर्थव्यवस्था, एस. के. मिश्रा आणि व्ही. के. पुरी, एस. चंद अँड कंपनी, नवी दिल्ली.
2. Indian Economy – Ramesh Singh, McGraw Hill Education, नवी दिल्ली.
3. Reserve Bank of India, Annual Report (विविध वर्षे).
4. NITI Aayog, भारत सरकार – विविध अहवाल व धोरणात्मक दस्तऐवज.
5. Ministry of Statistics and Programme Implementation, Government of India – National Income Statistics.
6. Planning Commission of India (माजी), पंचवार्षिक योजना अहवाल.
7. World Bank – India Development Reports.
8. International Monetary Fund – World Economic Outlook Reports.
9. Government of India – Economic Survey of India (विविध वर्षे).
10. Suresh Tendulkar समिती अहवाल (2011-12) – भारतातील दारिद्र्य मोजमाप.